# घटक 1 : प्रारंभिक काळ

## आ. जगन्नाथ शंकरशेठ

### (नाना शंकरशेठ उर्फ जगन्नाथ शंकर मुरकुटे - १८०३ ते १८६५)

**प्रास्ताविक**

कोकणातील देवज्ञ ब्राहमण (सोनार) मुरकुटे कुटुंब ठाण्यातील मुरबाडला स्थलांतरीत झाले होते. ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीचा कारभार सुरतऐवजी मुंबईहून सुरु झाला तेव्हा काही भारतीय व्यापाऱ्यांनाही त्यांच्यासह व्यापार करण्याची संधी मिळाली. त्यात मुरबाडचे बाबुलशेठ मुरकुटे हे एक होते. बाबुलशेठ यांनी मुलगा शंकरशेठ यांना जवाहिरी व सावकारीचे दुकान सुरु करून दिले पुढे शंकरशेठ मुरकुटे यांनी मुंबईत जवाहिर व्यवसायात मोठे नाव व संपत्ती कमावली सन १८०० मध्ये शंकरशेठ यांच्याकडे १६ लाखाची रोकड व २ लाखाचे जावाहिर होते यावरून त्यांच्या श्रीमंतीचा अंदाज येतो. या कुटूंबात जगन्नाथ शंकर शेठ यांचा जन्म मुंबईत १० फेब्रुवारी १८०३ रोजी झाला. नाना चार वर्षांचे असताना त्यांची आई भवानीबाई (ताईबाई) यांचे निधन झाल्याने जगन्नाथ यांचा सांभाळ वडिलांनीच केला. जगन्नाथ यांच्या मोठ्या बहिणीचे नाव भिवराबाई होते. जगन्नाथ १८ वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाल्याने लहान वयातच त्यांच्यावर व्यवसायाची जबाबदारी आली. ती त्यांनी उत्तमपणे पार पाडली. जगन्नाथ मुरकुटे नाना नावाने प्रसिध्द होते. तर त्यांची पुढील पिढी मुरकुटे ऐवजी शंकरशेठ नावानेच ओळखली गेली. नानांनी चांगला पैसा तर कमावलाच पण तो समाजोपयोगी कामांसाठी खर्च ही केला. दिवसेंदिवस नानांचा नावलौकीक वाढत गेला. सामाजिक शैक्षणिक राजकीय क्षेत्रात नानांनी मोठी कामगिरी केली. मोठया प्रमाणावर समाजोपयोगी कामासाठी देणग्या दिल्या. ३१ जुलै १८६५ रोजी नानांचा मृत्यू झाला. नानांनी आपल्या कार्यकाळात आधुनिक मुंबईचा पाया घातला. मुंबईचे शिल्पकार म्हणून त्यांचा गौरव केला जातो. नानांचे जीवनकार्य प्रेरणादायी व महाराष्ट्रासाठी दिशादर्शक ठरले. त्यांचे कार्य पुढीलप्रमाणे ...

**शिक्षणविषयक कार्य**

नानांना शिक्षणाचे महत्त्व लक्षात आले होते तसेच ते सर्वांना सहज उपलब्ध नाही ही मुख्य अडचणही त्यांनी हेरली होती. त्यामुळे नानांनी शिक्षण प्रसारासाठी प्रयत्न केले. मुंबई

इलाख्यात नव्या शिक्षणाचा पाया घालण्याचे कार्य एल्फिन्स्टन याच्या जोडीने नानांनी केले. 'विद्यादानाशिवाय आमच्या लोकांचा विकासच होणार नाही' अशी स्पष्ट भूमिका नानांनी एल्फिन्स्टन समोर मांडली होती. एल्फिन्स्टनने नानांशी विचारविनिमय करून मुंबई प्रांतासाठी शैक्षणिक धोरण ठरविले. शिक्षण विषयक कार्यात नानांनी मदत करण्याचे आश्वासन एल्फिन्स्टनला दिले होते. त्यानुसार २१ ऑगस्ट १८२२ रोजी मुंबईची 'हैंदशाळा' आणि 'शाळा पुस्तक मंडळी' या संस्थेची स्थापना झाली .पुढे या संस्थेचे नामांतर '**नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी**' करण्यात आले. त्यानुसार १८२३ मध्ये मुंबईत बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्य सुरु झाले. या संस्थेने महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार केला. शिक्षण प्रसारासाठी एक भारतीय माणसाने मुंबई शहरात स्थापन केलेली ही पहिलीच संस्था होती. या संस्थेच्यावतीने मुंबईत व मुंबई बाहेर अनेक शाळा सुरू करण्यात आल्या. यासाठी त्यांना जांभेकर व सदाशिव छत्रे यांची मदत झाली.

एल्फिन्स्टनच्या निवृत्तीनंतर त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याचे स्मारक व्हावे अशी नानाची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी विश्वस्त म्हणून तीन लाखाचा निधी जमविला. या निधीतून त्यांनी एल्फिन्स्टन हायस्कूल व एल्फिन्स्टन कॉलेज सुरु केले. तसेच गव्हर्नर सर रॉबर्ट ग्रँट यांच्या मृत्यूनंतर सभा भरली तेव्हा त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ग्रँट मेडिकल कॉलेज काढण्याची कल्पना नानांनी मांडली. व इ. स. १८४५ मध्ये ती पूर्ण केली. प्रारंभी विद्यार्थी मिळत नसताना अनेक सवलती देऊन कॉलेज जोपासले. १८६१ मध्ये ग्रँट मेडीकल कॉलेजात वैद्यकीय शिक्षण मराठीतून मिळण्याची व्यवस्था करण्यात आली.

परकीयांप्रमाणे कलाविषयक शिक्षण येथेही उपलब्ध व्हावे यासाठी जे. जे. स्कूल ऑफ आर्ट (सर जीजीभाय जमशेदजी स्कूल ऑफ आर्ट) ही संस्था स्थापन करण्यात नानांनी पुढाकार घेतला. हे भारतातील पहिले चित्रकलेसाठीचे कॉलेज होते. पेरी प्रोफेसरशिप ऑफ ज्युरिस्प्रूडन्स हे कायद्याचे कॉलेज सुरु करण्यात ही नानांचे योगदान मोठे होते. १८४५ मध्ये स्थापन झालेल्या स्टुडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटीचे एक संस्थापक नाना होते. नानांनी स्वत:च्या घरात मुलींसाठी शाळा काढली व मुलींच्या शिक्षणाविषयी घरोघरी फिरून दूर केला. मुलींच्या शिक्षणास असलेला विरोध दूर केला. स्वत: या शाळेस ३० हजाराची देणगी दिली. नानांनी अनेक शैक्षणिक संस्थांना उदार हस्ते मदत केली. पुण्यात असलेली संस्कृत पाठशाळा नानांच्या मदतीमुळे बंद झाली नाही. नानांचे संस्कृत भाषेवर प्रेम असल्याने त्यांच्या मुलाने संस्कृत मध्ये परीक्षेत प्राविण्य सिध्द करणाऱ्या मुलास जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्ती देण्यास सुरुवात केली.

१८५० ते ५६ याकाळात नाना मुंबई प्रांताच्या बोर्ड ऑफ एज्युकेशनचे सदस्य होते. मुंबई विद्यापीठाच्या स्थापनेतही (१८५७) नानांचे योगदान महत्त्वपूर्ण होते म्हणून त्यांना मुंबई विद्यापीठाचे पहिले मानद सदस्य (फेलो) म्हणून मान दिला गेला. नानाच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल दादाभाई नौरोजी म्हणतात 'जगन्नाथ शंकरशेठ यांनी या ठिकाणी शिक्षणाचे बीजारोपण करून आणि त्याच्या निकोप वाढीसाठी कष्ट घेऊन आम्हा भारतीयांचर मोठे उपकार करून ठेवले आहेत. '

**धार्मिक कार्य**

नानांनी धार्मिक विषयांच्या अनुशांगानेही मोलाचे काम केले आहे. हिंदू समाजाला स्मशानभूमी मिळावी यासाठी स्वत:ची जमीन दान दिली. धर्मांतराविरुद्ध भूमिका घेतली. त्यासाठी निषेध सभा घेतल्या. इंग्रज अधिकाऱ्यांना हाताशी धरून धर्मांतराचे काम थांबविले. धर्मांतरीतांचे शुद्धीकरण करून त्यांना मूळ धर्मात परत घ्यावे याबाबत त्यांची मते पुढारलेली होती. त्यांच्याकाळात दोन पारसी व्यक्तींनी धर्मांतर केले ही घटना गाजली होती.

**सामाजिक कार्य**

नानांचे सामाजिक सुधारणांचे कार्य विविधांगी व बहुमोल आहे अनेक सामाजिक कार्यकर्त्यांना त्यांनी मदतीचा हात दिला. सामाजिक सुधारणेच्याबाबतीत त्यांनी कायम पुरोगामी विचारांचा पुरस्कार व पाठपुरावा केला. बेटिंकने १८२९ सतीबंदी कायदा केला परंतु त्यामुळे भारतीय समाजात असंतोष निर्माण झाला. त्यावेळी महाराष्ट्रात कायद्याच्या बाजुने लोकमत तयार करण्यासाठी नानांनी प्रयत्न केला. सती प्रथा विरोधासाठी सहयांची मोहिम नानांनी राबविली होती. सतीप्रथा बंदी विरोधात सती प्रथा समर्थकांची सभा नानांनी आपले बळ वापरून होऊ दिली नाही. नानांनी स्त्रियांचे प्रश्न निवारणासाठी आवश्यक म्हणून स्त्री शिक्षणाचा पुरस्कार केला.समाजाची नैतिक बाबतीत सुधारणा होण्यास स्त्रियांच्या मनावर शिक्षणाचे संस्कार घडावे अशी नानांची इच्छा होती. लोकांचा विरोध पत्करून १८४८ मध्ये मुंबईत स्वत:च्या घरात नानांनी मुलींची शाळा सुरु केली होती. स्वत:च्या मुलीस प्रथमत: शाळेत पाठवून समाजाला आदर्श घालून दिला. मुंबईत स्त्रियांसाठी पहिले प्रसुतीगृह बांधले.

नानांचा जातीभेदास विरोध होता.जातीभेदातून एकत्र बसून शिक्षण घेता येत नाही हे नानांना आवडत नव्हते.

नानांनी वडील शंकरशेठ यांच्या नावाने धर्मार्थ दवाखाने चालू केले. जे. जे. हॉस्पिटलच्या उभारणीतही त्यांनी लक्ष घातले. बाल गुन्हेगारांना सुधारण्यासाठी ते स्वावलंबी असणे गरजेचे होते म्हणून त्यासाठीही नानांनी प्रयत्न केले. जुगार व तत्सम गोष्टींवर बंदी घालणारा कायदा व्हावा यासाठी प्रयत्न केले. भारतीयांना कमी खर्चात व सहज प्रवास करता यावा यासाठी नानांनी प्रयत्न केले. १८४५ मध्ये जलवाहतुकीसाठी बॉम्बे स्टीम नेव्हिगेशन कंपनी नानांनी स्थापन केली. नानाच या कंपनीचे मुख्य होते. नानांच्या अशा कार्यामुळेच बाळशास्त्री जांभेकर नानांचा उल्लेख आधुनिक महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाची गंगोत्री म्हणून करतात.

**आधुनिक मुंबईचा पाया / मुंबईत केलेल्या सुधारणा**

आधुनिक मुंबईचा पाया घालण्यात नानांचे योगदान मोठे आहे. मुंबईत अनेक सामाजिक शैक्षणिक आर्थिक (वित्त) संस्था नानाच्या पुढाकाराने व प्रयत्नाने स्थापन झाल्या. मुंबईतल्या इंग्रज राहत असलेल्या भागात सुधारणा केल्या जात.नानांनी कौन्सिलमध्ये गेल्यापासून (१८३४) मुंबईच्या इतर भागातही सुधारणा सुरु केल्याचांगले स्वच्छ व उजेडाची सोय असलेले रस्ते, भूमिगत गटारे अशा अनेक सुविधा दिल्या. राणीची बाग व अल्बर्ट म्युझियम स्थापन करण्यात नानांचा सहभाग मोलाचा होता.नानाच्याच प्रयत्नांनी अनेक बँका (मर्कंटाईल बँक, सेंट्रल बँक ऑफ वेस्टर्न इंडिया) मुंबईत सुरु झाल्या. १८३२ मध्ये इंग्लंड मध्ये रेल्वे सुरु झाली. भारतात रेल्वे सुरु व्हावी यासाठी प्रयत्न करताना रेल्वे कचेरीसाठी त्यांनी स्वत:च्या वाड्यात जागा दिली होती. १८४३ मध्ये भारतात रेल्वे सुरु करण्यासाठी स्थापन झालेल्या संस्थेत (दी इंग्लंड रेल्वे असोसिएशन) नाना होते. १८५० मध्ये नानांच्या उपस्थितीत रेल्वेच्या कामास सुरुवात झाली. भारतातील पहिली रेल्वे १६ एप्रिल १८५३ रोजी बोरीबंदर ते ठाणे धावलीसाठी नानांनी या रेल्वे . .केलेले प्रयत्न मोलाचे आहेत या पहिल्या प्रवासात नानाही उपस्थित होते. जी. आय. पी. रेल्वेच्या डायरेक्टर बोर्डावर नाना सदस्य होते. नानांनी अशा अनेक सुधारणा केल्यामुळे त्यांना **मुंबईचे शिल्पकार** म्हटले जाते. आचार्य अत्रे त्यांचा “मुंबईचा अनभिषिक्त सम्राट” म्हणून उल्लेख करतात.

.

**राजकीय कार्य**

१९ व्या शतकाच्या सुरूवातीला महाराष्ट्रात ब्रिटिश राजवट स्थिर होऊ लागली होती. आपल्या राज्याची घडी बसवतानाच इंग्रजांनी गरजेनुरूप सुधारणाही केल्या. राज्य टिकविण्यासाठी

भारतीयांचा प्रशासनात सहभाग वाढवून त्यांच्यात इंग्रजाबद्दल जिव्हाळा निर्माण करण्यास प्रयत्न झाले. त्याच हेतूने एल्फिन्स्टनने मुंबईत कल्याणाच्या अनेक योजना राबविल्या. त्यातून एल्फिन्स्टनमुळे नानाचा अनेक अधिकाऱ्याशी परीचय झाला. या ओळखीचा उपयोग नानांनी लोककल्याणासाठी केला. नानाचा राजकारण व राजकीय कार्यक्रमांशी संबंध वाढल्याने अनेक अडचणी सरकार दरबारी मांडून नाना सोडवू लागल्याने त्यांचा राजकीय प्रभावही वाढला. नाना सरकारला उणीवा दाखवून दुरुस्तीस सहकार्य करू लागले. भारतीयांच्या समस्या इंग्लंडपर्यंत पोहचविणे व समस्या सोडविण्यासाठी राजकीय संस्था स्थापन करण्यास नानांच्या अध्यक्षतेत २६ ऑगस्ट १८५२ रोजी बैठक होऊन पश्चिम भारतातील पहिली राजकीय संस्था बॉम्बे असोसिएशन दादाभाई नौरोजींच्या सहकार्याने नानांनी स्थापन केली. ही जनतेच्या राजकारणाचा पाया घालणारी भारतातील पहिली राजकीय संस्था होती. या संस्थेचे प्रतिष्ठित अध्यक्ष जमशेदजी जीजीभाई तर अध्यक्ष नाना होते. काही काळ त्यांनी उपाध्यक्ष म्हणूनही काम केले. या संस्थेत सर्व जाती धर्माचे लोक होते. या संस्थेच्या स्थापनेचा हेतू स्पष्ट करताना नाना म्हणाले होते, "या देशातील जनतेचे कल्याण करावे अशी इंग्रज सरकारची इच्छा आहे हे खरे पण आमची अशी काही दुखे आहेत ती सरकारच्या नजरेस येत नाहीत म्हणून ती सरकारच्या नजरेस आणून द्यावीत व रयतेच्या सुखाकरिता सरकारला सर्व गोष्टीत साहाय्य कारावे म्हणून ही संस्था काढली आहे." कायदे मंडळात भारतीयांना प्रतिनिधीत्व मिळण्यासाठी या संस्थेने केलेल्या कार्यामुळे १८६१ भारतीयांचा कायदे मंडळात प्रवेश देण्याचे मान्य झाले. सरकारने भेदाभेद करू नये. काळागोरा फरक करू नये. जातीच्या नावाखाली कमी लेखू नये. न्यायदानात भारतीयांचा समावेश करावा. यासाठी काम केले. त्यामुळे १८३६ मध्ये प्रथम भारतीयांना न्यायदानाच्या कामात ग्रांड ज्युरीत बसण्याचा हक्क मिळाला. नाना कायदे मंडळाचे पहिले भारतीय प्रतिनिधी झाले. कायदे मंडळात जनहिताची विविध कामे केली. मुंबईच्या म्युनिसिपल कमिशनचेही ते सभासद झाले.

**समारोप**

नानांनी आपल्या कार्यकाळात नव्या विचारांचा स्वीकार करत समाजात विविधांगी सुधारणा करण्याचे कार्य केले. नाना खऱ्या अर्थाने जनतेचे सेवक होते. सर्वांगीण सुधारणेचे ते प्रवर्तक होते. लोकसेवेची त्यांना तळमळ होती. आचार्य जावडेकर यांच्या मते 'लोकांच्या वतीने सरकारशी बोलणारे व मध्यस्थी करणारे मुंबईतील पहिले पुढारी म्हणजे नाना शंकरशेठ होत.' आधुनिक मुंबईच्या निर्मितीतही नानाचे बहुमोल योगदान आहे ३१ जुलै १८६५ रोजी नानांचा मृत्यू झाला.त्यांची स्मृति व गौरव म्हणून गिरगावातील एका मार्गाला व गवालिया टँकजवळील एका

चौकाला त्यांचे नाव देण्यात आले. त्यांचा पुतळाही उभारण्यात आला. मुंबईप्रमाणेच महाराष्ट्र व भारतभरात आधुनिकतेचा पाया घालण्याचे, सुधारणांचा पुरस्कार करण्याचे काम जगन्नाथ शंकरशेठ यांनी केले आहे. इंग्रजांनीही त्यांच्या कार्याचे महत्त्व समजून घेत त्यांना **जस्टीस ऑफ द पीस** (जनतेला न्याय मिळावा म्हणून राजाने नेमलेला प्रतिनिधी) किताब दिला होता.

नानांनी आपल्या कार्यासाठी अनेक संस्था स्थापन केल्या व त्यांना आर्थिक मदत देऊन त्या टिकवून त्यांच्या कार्याचा प्रसारही केला. नानांनी आपल्या पदाचा, ओळखींचा आणि आपल्या संपत्तीचा उपयोग लोकांच्या कल्याणासाठी व सुधारणांसाठी केला.